# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** लोणार
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0016 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/01/2025 04:05

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 17/01/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 17/01/2025
**Time From (वेळेपासून):** 15:18 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:39 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 18/01/2025 **Time (वेळ):** 03:57 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/01/2025 03:57 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** माउली गजानन हॉटेल, बस स्टँड ज,लोणार

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): विजय रंजाबराव पवार

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1962

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सुलतानपुर ,लोणार,लोणार ,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सुलतानपुर ,लोणार,लोणार ,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9860552066

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | उमेश पंडितराव सानप | | | 1. खटकेश्वर नगर, लोणार,लोणार, लोणार ,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

**S.No.** **UIDB Number**
**(अ.क्र.)** **(यु.आय.डी.बी.क्र.)**

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

कायमी -अप नं. /2025कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988
फीर्यादी - विजय संजाबराव पवार वय 63 वर्षे, व्यवसायः शेती रा. सुलतानपुर ता. लोणार जि. बुलढाणा. ह.मु. शिवाजी नगर, भोकरदन नाका, जालना मो.क. 9860552066
आरोपी - उमेश पंडितराव सानप वय 39वर्ष पद- भुकरमापक तालुका उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय,लोणार रा. पिंपळनेर ता लोणार ह मु खटकेश्वर नगर, लोणार ता लोणार जि बुलडाणा
घटनास्थळ- माउली गजानन हॉटेल, बस स्टँड जवळ लोणार
घटना ता वेळ- दि. 17/01/2025चे 15/18 ते 15/39वा दरम्यान

हकिकत अशा प्रकारे आहे की, नक्कल लेखी फिर्याद शासकिय विश्रामगृह लोणार दिनांक 18-01-2025 विजय संजाबराव पवार वय 63 वर्षे, व्यवसायः शेती रा. सुलतानपुर ता. लोणार जि. बुलढाणा. ह.मु. शिवाजी नगर, भोकरदन नाका, जालना मो.क. 9860552066समक्ष टकलिखीत फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असून वर नमुद ठिकाणी कुटुंबासह राहतो व सध्या शेती व्यवसाय करतो.दिनांक 17-01-2025 रोजी मी अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा येथील पोलीस उपअधिक्षक, श्रीमती घोगरे मॅडम यांना फोनव्दारे माहिती दिली की, माझी ग्राम सुलतानपुर येथे गावालगत गट क्र 11 मध्ये 43 आर शेती असुन त्यावर प्लॉटींग करावयाची असल्याने त्याबाबत मी उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, लोणार यांनी मोजणी व हदद कायम करुण दिल्यानंतर मी नगर रचनाकार विभाग बुलढाणा तसेच उपविभागीय अधिकारी मेहकर यांचे कार्यालयाची रीतसर तात्पुरत्या स्वरुपात परवानगी घेवुन, उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय लोणार यांचेकडे मोजणी करुन सिमांकन करण्याकरीता दि. 30-12-2024 रोजी प्रकरण सादर केलेले आहे. सदर प्रकरणात उपअधिक्षक भुमी अभिलेख लोणार येथील मोजणी लिपीक/भुकरमापक श्री. सानप साहेब हे छाणनी, मोजणी व सिमांकन करुन देण्याकरीता 80,000/- रुपयाची लाच मागणी करीत असल्याबाबत फोनवर माहिती दिली होती. त्यावरुन दि. 17-01-2025 रोजी पोलीस उपअधिक्षक, श्रीमती घोगरे मॅडम यांनी नगर परीषद चिखली कार्यालयाचे दोन शासकिय कर्मचारी पंच म्हणून उपलब्ध करुन घेवून सदर पंच व सापळा पथक असे त्यांचे कार्यालयाचे शासकिय वाहनाने ग्राम लोणारचे अलीकडे असलेल्या ग्राम पारडी सिरसाठ नवीन गावठान परिसरात पोहचले. त्यानुसार घोगरे मॅडम यांनी दिलेल्या सुचनेनुसार मी सुध्दा ग्राम पारडी सिरसाठ नवीन गावठान परिसरात कार्यवाही पथकाजवळ पोहचलो. त्यावेळी घोगरे मॅडम यांनी माझा तसेच पंचाचा आपसात परिचय करुन देवून माझी रितसर वरिलप्रमाणे लेखी तकार नोंद करुन घेतली. त्यांनतर घोगरे मॅडम यांनी पडताळणी कार्यवाहीबाबत सुचना देवून व्हॉईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती दिली. त्याबाबत सविस्तर पडताळणी पुर्व पंचनामा करण्यात आला आहे. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीनुसार यातील लोकसेवक श्री. सानप यांची लाचेची मागणी आहे किंवा कसे याबाबत उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय लोणार येथे जावून त्यांची भेट घेण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार घोगरे मॅडम यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन सदर व्हॉईस रेकॉर्डर नापोका विनोंद लोखंडे यांचे करवी माझे शर्टाचे आतून बाहेरुन दिसणार नाही अश्याप्रकारे लटकावून दिले व पंच क्र 1 श्री. प्रशांत काळे यांचेसह माझे खाजगी मोटार सायकलने 12.27 वा. भुमीअभिलेख कार्यालय लोणारकडे रवाना केले. त्यावेळी मी व पंच क्र.1 काळे असे आम्ही उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, लोणार येथे जावून कार्यालयात उपस्थीत असलेले सानप साहेब यांचेशी मी पंच क्रमांक 1 काळे यांचे समक्ष प्रकरणासंबंधी बोलणी केली असता झालेल्या बोलणीदरम्यान लोकसेवक श्री. सानप हे मला म्हणाले की, दुसरा कोणीबी असता मी त्याला एक लाख विस हजार रुपये चलान भरायला सांगितले असते फक्त हे तुमच्यासाठी असे म्हणुन अर्ध्या तासाने येण्यास सांगितल्याने मी व पंच क्रमांक 1 कारवाई पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यावेळी माझे गळयातील व्हाईस रेकॉर्डर आपण

ताब्यात घेवुन बंद केले. पंच क्रमांक 1 श्री काळे यांना घडलेल्या हकीकत विषयी विचारणा केली असता त्यांनी वरीलप्रमाणे हकीकत सांगितली त्याबाबत घोगरे मॅडम व सापळा पथकाने व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वणीमुद्रीत झालेले संभाषण ऐकून त्याबाबत खात्री करीत असतांना माझे मोबाईलवर श्री. सानप साहेबांचा फोन आला. त्यावेळी आपण तात्काळ व्हाईस रेकॉर्डर सुरु केले व मला फोन रिसीव्ह करुन स्पीकरऑन मोडवर ठेवण्यास सांगितल्याने मी सानप साहेब यांचा फोन रिसीव्ह करुन स्पिकर ऑन मोडवर त्यांचेशी पंचासमक्ष बोलणी केली असता झालेल्या बोलणी दरम्यान मी लोकसेवक सानप यांना माझेकडे 60,000/- रुपयांची व्यवस्था झालेली आहे असे सांगितले असता लोकसेवक सानप यांनी लाचेचा पहिला हप्ता 60,000/ रुपये स्विकारण्यास संमती दिल्याने सदर प्रकरणात दिनांक 17-01-2025 रोजी सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे ठरविण्यात आले.त्यानुसार घोगरे मॅडम यांनी लोकसेवक श्री. उमेश सानप, यांचे लाच मागणी प्रमाणे त्यांना देण्यासाठी लाचेचा पहिला हप्ता 60,000/- रुपये हजर करण्यास सांगितले असता मी माझेजवळील 500/- रुपये दराच्या भारतीय चलनातील 120 नोटा असे एकुण 60,000/- रुपये घोगरे मॅडम यांचेकडे हजर केले. त्यावेळी घोगरे मॅडम यांनी सापळा पथकातील सदस्याचे मदतीने सदर नोटांचे क्रमांक नोंद करुन घेवून त्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्याची प्रक्रिया पुर्ण केली. त्यानंतर सदर लाच रक्कम माझे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशयात ठेवून देवून मला व पंचाना सापळा कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर घोगरे मॅडम यांनी दिलेल्या सुचनेनुसार मी लोकसेवक उमेश सानप यांना माझे फोनवरुन फोन करुन लाच रक्कम घेवुन कुठे भेटायचे विचारले असता लोकसेवक सानप यांनी बसस्टॅन्डवर भेटू असे सांगितल्याने सर्वानुमते पुढील सापळा कार्यवाही लोणार बसस्टॅण्डजवळ करण्याचे ठरविण्यात आले. त्याबाबतचा सविस्तर सापळा पुर्व पंचनामा करण्यात आला आहे.त्यानुसार लोणार बसस्टॅन्ड येथे पुढील सापळा कार्यवाही करीता घोगरे मॅडम यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन नापोकों. विनोद लोखंडे यांचे करवी माझे गळयात लटकावून दिले. त्यानंतर मला व पंच क्रमांक 1 श्री. काळे यांना माझे खाजगी मोटार सायकलने लोणार बसस्टॅन्डकडे 15.18 वा. रवाना केले. त्यावेळी आमचे मागोमाग घोगरे मॅडम, सापळा पथक, तसेच पंच क्रमांक 2 श्री. देशमुख असे शासकिय वाहनाने लोणार बसस्टॅन्डकडे रवाना झाले. त्यावेळी मी व पंच तसेच सापळा पथक असे बसस्टॅन्डचे समोरील परिसरात पोहचले. त्यावेळी मी व पंच क्रमांक 1 श्री. काळे असे बसस्टॅन्डला लागून असलेल्या माऊली गजानन हॉटेलमध्ये जावुन बसून पुन्हा लोकसेवक सानप साहेब यांना फोन करुन माऊली गजानन हॉटेलमध्ये बसलेलो असल्याबाबत कळविले. त्यानंतर थोड्याच वेळात लोकसेवक श्री. सानप हे आम्ही बसलेल्या ठिकाणी आले. त्यावेळी आमच्यात माझे प्लॉटींगचे मोजणी तसेच सिमांकनासंबंधाने बोलणी झाली, त्यावेळी लोकसेवक सानप यांनी माझेकडे किती आणले? अशी लाच रकमेबाबत माझेकडे विचारणा केली. मी 60,000/- रुपये आणले आहे. सांगुन माझे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशातील लाच रक्कम 60,000/- रुपये काढून लोकसेवक श्री. सानप यांना देवुन मोजुन घ्या असे बोललो असता त्यांनी लाच रक्कम त्यांचे उजव्या हातांनी स्विकारुन नेसत्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवून दिली. त्यावेळी मी लोकसेवक सानप यांना म्हणालो की, राहिलेले विस हजार नंतर देतो. त्यानंतर मी माझा चष्मा काढून शर्टचे खिशात लटकवून लाच रक्कम स्विकारल्याबाबत नियोजित इशारा केला असता, पोलीस उपअधिक्षक श्रीमती घोगरे मॅडम व सापळा पथकातील सदस्य असे आमचे जवळ आले व त्यांनी लोकसेवक सानप यांना ताब्यात घेवून त्यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. उमेश पंडीतराव सानप वय 39 वर्ष पद भुकरमापक, उपअधिक्षक तालुका भुमी अभिलेख कार्यालय लोणार ता. लोणार जि. बुलढाणा ह. मु. खटकेश्वर नगर, लोणार, मुळ रा. पिंपळनेर ता. लोणार जि. बुलढाणा असे सांगितले. त्यावेळी कारवाई पथकाने उमेश सानप यांना माझेकडून लाच रक्कम स्विकारल्यामुळे ताब्यात घेवून झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा केला.आलोसे. उमेश सानप यांनी दिनांक 17-01-2025 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान माझी ग्राम सुलतानपुर येथील गट कमांक 11 मधील 43 आर जमीनीची प्लॉटींग करण्याकरीता आवश्यक असलेल्या मोजणी व सिमांकन करुन देण्याकरीता 80,000/- रुपये लाच मागणी करुन लाचेचा पहिला हप्ता 60,000/- रुपये स्विकारण्यास संमती देवुन दि. 17-01-2025 रोजी 15.18 ते 15.39 वा दरम्यान बसस्टॅन्ड लोणारच्या बाजुला असलेल्या माऊली गजानन चहा नाष्टयाच्या हॉटेलमध्ये त्यांनी माझेकडून 60,000/- रुपये स्विकारल्याने सापळा पथक अधिकारी यांनी लोकसेवक सानप यास ताब्यात घेवुन त्यांचे कार्यालयात नेवुन माझी कागदपत्राची कार्यालयी पाहणी केली असता सानप यांनी आजरोजी 21000/- रुपयांची मोजनीची चलान पावती तयार केल्याचे दिसुन आल्याने 60,000/-रुपयापैकी 39000/- रुपये लाच रक्कमेचा पहिला हप्ता म्हणुन गैरमार्गाने स्विकारुन स्वताचा आर्थिक गैरलाभ करुन घेतल्याने त्यांचेविरुध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे मी दिलेली फिर्याद संगणकावर नापोकॉ. विनोद लोखंडे यांनी टंकलिखित केली संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेल्या फिर्यादीच प्रिंट काढून त्या मी वाचून पाहीली माझो सांगणेप्रमाणे बरोबर आहे. अशा लेखी फीर्याद वरुन अप. सदरचा दाखल करुन तपास मा.पोलीस अधिक्षक सो.शितल घोगरे मॅडम अँटी करप्शन ब्युरो बुलडाणा यांचेकडे देण्यात आला.

13. Action taken: **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

NIMISH MAHADEVRAO MEHETRE(I (Inspector)) / 15101000402NMMM7701L

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

Rank (पद):

**No.**(क्र.):

to take up **the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point **of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणेदार
पो.स्टे. ... जि.बुलढाणा.

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): NIMISH MAHADEVRA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 15101000402NMMM77

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the (If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**